**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ५१ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक – १६९** **दिनांक – २४/०६/२०२५**

**विभाग – सार्व. बांधकाम विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय** – ई निविदा क्र ६७९५८२ प्र. क्र१० मधील लालटाकी कमान ते भारस्कर कॉलनी परिसरात रस्ता कॉक्रटीकरण करणे या कामाची सुरक्षा अनामत रक्कम परतावा करणे बाबत.

--**--

**ठराव** – सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रस्तावित केले प्रमाणे, ई निविदा क्रमांक ६७९५८२ प्र. क्र.१० मधील लालटाकी कमान ते भारस्कर कॉलनी परिसरात रस्ता कॉक्रटीकरण करणे या कामाची सुरक्षा अनामत रक्कम परतावा करणे बाबत महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता २०११ मधील नियम २९९ नुसार सदरची कामाची अनामत रक्कम व्यापगत झालेली असल्याने परत करण्याकारीता मा. महासभेची मंजुरी घेणे आवश्यक असल्याने रूपये ८९,४९६/- सदरची व्यपगत झालेली रक्कम श्री. सचिन बाबासाहेब सापते यांना अदा करणेस प्रशासक सर्वसाधारण सभा मंजूरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
( मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

सही/-
(यशवंत डांगे)
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ५१ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक — १७०** **दिनांक — २४/०६/२०२५**

**विभाग — नगररचना विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय** — महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे ,श्रेणीवाढ व नियंत्रण ) अधिनियम २००१ यात सुधारणा करणेसाठी सन २०२१ चा अधिनियम क्र .४ बाबत

--**--

**ठराव** — विभागाने प्रस्तावित केले प्रमाणे महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण ) अधिनियम, २००१ यात सुधारणा करणेसाठी सन. २०२१ अधिनियम क्र. ४ दिनांक १० मार्च, २०२१ अन्वये शासनाने लागु केलेला आहे. व दिनांक १८/१०/२०२१ च्या आदेशान्वये शासनाने गुंठेवारी विकासासाठी सुधारीत प्रशमन शुल्क व विकास शुल्क दर लागु केलेले आहेत .

उपरोक्त अधिनियमातील तरतुदीनुसार ३१ डिसेंबर २०२० पर्यंत झालेले भुखंडाचे अनाधिकृत तुकडे,अनाधिकृत बांधकामे नियमानुकुल करता येतील सदर अधिनियमाप्रमाणे कार्यवाही ही करणेसाठी व ३१ डिसेंबर २०२० पर्यंतचे अनाधिकृत असलेले भुखंड व बांधकामे नियमानुकुल करणेसाठी प्रस्ताव दाखल करणे बाबत नागरीकांना जाहिर आवाहन करणेसाठी स्थानिक दोन वर्तमान पत्रामध्ये जाहिर नोटीस प्रसिध्द करणे आवश्यक आहे. सदर गुंठेवारी प्रस्ताव दाखल करणेची मुदत वर्तमान पत्रात जाहिर नोटीस प्रसिध्द झालेच्या तारखेपासुन सहा महिने इतकी ठेवणे बाबत व सदर कामी येणा-या खार्चास मा. प्रशासक सर्व साधरण सभा मंजुरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ - २०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
( मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

सही/-
(यशवंत डांगे)
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

# अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर

नगरसचिव विभाग

प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ५१ विषयाबाबतचे निर्णय

मा.प्रशासक ठराव क्रमांक -१७१ दिनांक – २४/०६/२०२५

विभाग – सामान्य प्रशासन विभाग

---

**प्रस्तावाचा विषय –** रसिक ग्रुप अहिल्यानगर आयोजित गुढीपाडवा रसिक सांस्कृतीक महोत्सव (रसिकोत्सव ) दिनांक ३० मार्च २०२५ सांस्कृतीक अनुदान (मुख्य प्रायोजकत्व ) अदा होणे बाबत

--**--

विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार श्री.जयंत येलूलकर ,अध्यक्ष ,रसिक ग्रूप ,अहिल्यानगर यांनी अहिल्यानगर शहराच्या सांस्कृतिक समृध्दीसाठी आपण महानगरपालिकेच्या माध्यमातून आपण मोलाचे योगदान देत आहात ही नगरवासियांच्या दृष्टीने आनंददायी बाब आहे .रसिक ग्रूप (रसिक ग्रूप ऑफ कल्चरल , सोशल अँण्ड एज्युकेशन ) या संस्थेच्या माध्यमातून अहिल्यानगर मध्ये गेल्या 23 वर्षापासून महाराष्ट्रातील सर्वात मोठा गुढी पाडवा सांस्कृतिक महोत्सव आयोजित केला जातो .या सोहळ्यासाठी आपले बहुमोल योगदान लाभते हे विनम्रतापूर्वक नमूद करावेसे वाटते .

यंदाच्या 30 मार्च 2025 रोजी आयोजित केलेंडर रसिकोत्सव या भव्य विनामूल्य सांस्कृतिक सोहळ्यासाठी आपल्या महानगरपालिकेने मुख्य प्रायोजकत्व स्विकारून मोलाचे सहकार्य केले .यासाठीचे अनुदान रक्कम रूपये -/10,00,000 (रूपये दहा लाख मात्र) लवकरात लवकर मिळावे अशाबाबत विनंती केली आहे .

तसेच रसिक ग्रूप ,अहिल्यानगर संस्थेस गुढीपाडवा सांस्कृतिक महोत्सव रसिकोत्सव 2025 -- साठी अहिल्यानगर महानगरपालिकेचे प्रमुख प्रायोजकासाठीचे रक्कम रूपये 10 लाख अनुदान मागणी केलेले आहे .

तसेच अर्जदार यांनी संदर्भिय पत्रासमवेत संस्थेचे धर्मादाय आयुक्त संस्था प्रमाणपत्र ,संस्थेचे तीन वर्षाचे लेखा परिक्षण अहवाल ,वर्तमानपत्रातील बातम्या ,कार्यक्रम निमंत्रण पत्रिका ,इत्यादी जोडले आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 66 अन्वये महानगरपालिकेस स्वेच्छा निर्णयानुसार सादर कलमात नमूद केलेल्या बाबीसाठी किंवा अन्य कोणत्याही बाबीसाठी तरतूद करता येईल . अधिनियमातील कलम 66 (41) मध्ये पुढील प्रमाणे तरतूद आहे .

कोणतेही सार्वजनिक स्वागत समारंभ किंवा करमणुकीचे कार्यक्रम यासाठी कोणतेही अंशदान देणे; सन 2026-2025 या आर्थिक वर्षामध्ये " सामाजिक संस्थांना देणगी " या लेखाशिर्षकाखालील रक्कम रूपये 05लाख एवढी तरतुद करण्यात आली आहे .रसिक ग्रूप ,अहिल्यानगर यांना गुढी पाडवा सांस्कृतिक महोत्सव रसिकोत्सव 2025 - साठी रक्कम रूपये ५ लाख अदा करणेस प्रशासक सर्वसाधारण सभा मंजूरी देत आहे. यापुढे सदर कार्यक्रमाकरीता पूर्व मंजूरी घेण्यात यावी. अन्यथा अनुदान अदा करण्यत येणार नाही . याची स्पष्ट नोंद घेणे बाबत अवगत करण्यात यावे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
( मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

सही/-
(यशवंत डांगे)
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

# अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर

नगरसचिव विभाग

प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ५१ विषयाबाबतचे निर्णय

मा.प्रशासक ठराव क्रमांक -१७२ दिनांक – २४/०६/२०२५

विभाग – घनकचरा विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका हद्यीतील निर्माण होणारा दैनंदिन कचरा संकलन व वाहतुक करणे कामी जाहिर ई निविदा करणे मान्यते बाबत

--**--

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसानर अहिल्यानगर महानगरपालिका हददीतील निर्माण होणारा दैनंदिन कचरा संकलन व वाहतुक करणेकामी ई निविदा प्रक्रिया राबवून मे.श्री.जी.एजन्सीज, अहमदाबाद या संस्थेस तीन वर्षा करिता कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे. सदर आदेशान्वये सदर संस्थेची मुदत १५ फेब्रुवारी २०२६ अखेर आहे. तथापी निविदा अटी व शर्ती नुसार कचरा संकलन व वाहतुकीचे दैनंदिन घर ते घर कचरा संकलनाचे कामकाज होत नसले बाबत तसेच शहरामध्ये जी. व्ही.पी.पॉईन्ट मोठया प्रमाणात निर्माण झाले असून सदर जी. व्ही.पी.पॉईन्ट वेळोवेळी उचलतन नसले बाबत निदर्शनास येत आहे. तसेच निविदा अटी व शर्ती नुसार सुका कचरा व ओजला कचरा संकलीत करीत नसले बाबत निदर्शनास येत आहे. तसेच निविदा अटी व शर्ती नुसार सुका कचरा व ओजला कचरा संकलीत करीत नसले बाबत निदर्शनास आले आहे. सदर बाबत मे.श्रीजी एजन्सीस या संस्थेस वेळोवेळी समक्ष तोंडी,लेखी सुचना देवूनही दैनंदिन कामामध्ये सुधारणा करून सुसुत्रता आणलेली नाही तसेच मनपा मार्फत देण्यात येणा-या सुचना व आदेशाचे पालन करीत नसले बाबत निदर्शनास येत आहे. याबाबत सदर संस्थेस नोटीस देण्यात आलेल्या आहेत. तरी देखील संस्थेच्या कामामध्ये सुधारणा झालेली नाही संस्थेचे सदरचे वर्तन हे कामाच्या अटी व शर्तीचा भंग करणारी व मनपा प्रशासनास वेठीस धरणारी असून सदरच्या वर्तनुकीमुळे मनपाच्या प्रशासन नागरिकांच्या रोषास सामोरे जावे लागत असून मनपाची नाहक बदनामी होत आहे. याबाबत मे.श्रीजी एजन्सीज अहमदाबाद या संस्थेस अंतिम नोटीस बजावण्यात आलेली असून खुलासा मागीतला आहे. सदर संस्थेने खुलासा सादर केला आहे. खुलाश्याचे अवलोकन केले असता करारनाम्यातील अटी व शर्ती नुसार समाधानकारक वाटत नाही निविदेमधील अटी व शर्ती नुसार सदर संस्थेस ९० दिवस पूर्ण होईपर्यत करारनामा रद्य करता येणार नाही. तथापी शहरामध्ये ठिकठिकाणी मोठया प्रमाणामध्ये कच-याचे ढिक साचले असून ते संस्थेने वेळच्या वेळी न उचलल्यामुळे मनपास नागरिक तसेच पदाधिकारी यांच्या रोषास सामोरे जावे लागत आहे. तसेच संस्थेने नमुद केले नुसार आवश्यकते प्रमाणे कचरा संकलन करणे कामी वाहने वाढविणे अपेक्षित आहे. मात्र् तसे दिसून येत नाही दैनंदिन निर्माण होणारा कचरा वेळेत उचलून कचरा डेपो येथे वाहतुक करणे निविदाकार संस्थेची जबाबदारी आहे. सदरची जबाबदारी संस्था चोखरित्या पार पाडत नसल्याचे निदर्शनास येत आहे.त्यामुळे मोठया प्रमाणात वरिष्ठांकडे तक्रारी प्राप्त झाल्या आहेत

सद्यस्थितीमध्ये पावसाळा सुरूवात झाल्यामुळे कचरा न उचलल्यामुळे साथीचे आजार पसरण्याचा धोका संभावतो.



तरी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील निर्माण होणारा दैनंदिन कचरा संकलन व वाहतुक करणे कामी मेश्री.जी.एजन्सीस, अहमदाबाद या ठेकेदार यांनी निविदापत्रातील अटी व शर्तीचे पालन करीत नाही. नोटीशीच्या अनुषंगाने संबंधीताने सादर केलेला खुलसा अत्यंत मोघम स्वरूपाचा असून वस्तुस्थितीशी विसंगत व असमाधान कारक आहे. त्यामुळे विभागने कायदेशीर सोपस्कार पूर्ण करून मे.श्री.जी.एजन्सीस, अहमदाबाद यांचेशी करण्यात आलेला करारनामा रद्द करणेस तसेच अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील निर्माण होणारा दैनंदिन कचरा सकंलन व वाहतुक करणे कामी प्रति मे.टन वजनाप्रमाणे कचरा संकलन व वाहतुक करणे कामी खाजगी संस्थेची नियुक्ती करणे कामी प्रस्तावित केल्यानुसार ई निविदेचा प्रारूप मसुदा प्रसिध्दी, आर्थिक व प्रशासकीय मान्यता या कार्यालयीन केलेल्या कार्यवाहीस स्थायी समितीने कार्योत्तर मंजूरीसह शिफारस केलेल्या सदरच्या प्रस्तावास कार्योत्तर मा.प्रशासक मा.सर्वसाधारण सभा मंजूरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
( मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

सही/-
(यशवंत डांगे)
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका